# शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यावर भर देऊ

## प्रभारी कुलगुरु नितीन करमळकर : शिवाजी विद्यापीठाचा लौकिक वाढवण्यासाठी सर्वांना बरोबर घेऊ

लोकमत न्यूज नेटवर्क,

कोल्हापूर : आव्हाने पेलण्याची क्षमता निर्माण करणाऱ्या शिक्षणावर भर देऊन काम करणार आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याचा माझा प्रयत्न राहणार असल्याची ग्वाही शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी बुधवारी दिली.

या विद्यापीठाचे मावळते कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांचा पाच वर्षांचा कार्यकाल पूर्ण झाला. त्यांनी या पदाचा कार्यभार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. करमळकर यांच्याकडे सुपूर्द केला.



कोल्हापुरात बुधवारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी शिवाजी विद्यापीठाचे मावळते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून प्रभारी कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारला. यावेळी डावीकडून विलास नांदवडेकर, प्रताप पाटील, डी. टी. शिर्के उपस्थित होते.

समाजातील विविध आव्हानांचा सामना करताना आपण कमी पडत आहोत. ते लक्षात घेता सर्व अभ्यासक्रमांची पुनर्रचना करणे गरजेचे आहे. शिवाजी विद्यापीठ ही माझी मातृसंस्था आहे. प्रभारी कुलगुरुपदाच्या जबाबदारीमुळे काही काळ मला या मातृसंस्थेची सेवा करण्याची संधी प्राप्त झाली आहे. विद्यापीठाचा लौकिक वृद्धिगत करण्यासाठी सर्व संबंधित घटकांना सोबत घेऊन काम करण्यास प्राधान्य राहील, असे डॉ. करमळकर यांनी सांगितले. दरम्यान, कार्यभार स्वीकारण्यापूर्वी विद्यापीठातील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास डॉ. करमळकर यांनी अभिवादन केले. यावेळी त्यांचे बंधू विनायक आणि पुतणी श्रुती करमळकर उपस्थित होती.

### ठसा ठेवून जाणारे काम करीन

गेल्या वेळी मी शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा उमेदवार होतो. त्यामुळे या विद्यापीठाबाबत काही स्वप्ने होती. ज्या भागात वाढलो, त्या भागासाठी चांगले काम करण्याचे ध्येय आहे. मला माहीत नाही, माझ्याकडे किती कालावधी असेल; पण, जितका कालावधी मिळेल, त्यात जास्तीत जास्त ठसा ठेवून जाण्यासारखे काम मी निश्चितपणे करीन, अशी ग्वाही डॉ. करमळकर यांनी दिली.

ळ आहे
ड शुगर) नियंत्रणाची

## देवानंद शिंदे : मातृसंस्थेत काम केल्याने शैक्षणिक परिक्रमा पूर्ण

# विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी काम केले

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा कुलगुरू झाल्यामुळेच फुले-शाहू-आंबेडकर या विचारधारेचा पाईक म्हणून माझी एका अर्थाने एक शैक्षणिक परिक्रमा पूर्ण झाली. या कार्यकाळात माझ्या परीने विद्यार्थिकेंद्री व विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी उत्कृष्ट काम करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला. कोल्हापुरातील प्रत्येक समाजघटकाने मला इतके प्रेम दिले की त्यातून उतराई होणे अशक्य आहे, असे प्रतिपादन मावळते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी केले.

कुलगुरू डॉ. शिंदे यांना विद्यापीठातर्फे औपचारिक निरोप देण्यात आला. व्यवस्थापन परिषद हॉलमधील या कार्यक्रमात त्यांनी संवाद साधला. त्यांच्या बरोबरीने प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचाही कार्यकाळ संपला. एका डोळ्यांत हसू आणि दुसऱ्या डोळ्यांत अश्रू अशी काहीशी मानसिक अवस्था झाली आहे. आपणा सर्वांच्या साथीने हा पाच वर्षांचा प्रवास अत्यंत आनंददायी आणि चिरस्मरणीय झाला असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

विद्यापीठ ही माझी मातृसंस्था आहे. तिला विविध भूमिकांतून योगदान देण्याचा मी नेहमीच प्रयत्न केला. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्यासारख्या संवेदनशील मनाच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाला योगदान देता आले, याचा मोठा आनंद असल्याचे डॉ. शिर्के यांनी सांगितले.



कोल्हापुरात बुधवारी शिवाजी विद्यापीठाचे मावळते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा सत्कार कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केला. यावेळी डावीकडून कैरवी, अनिता व नागरबाई शिंदे, डी. टी. शिर्के, सुनीता शिर्के उपस्थित होत्या.

### २९०० जणांचा ऑनलाईन सहभाग

मोजके पदाधिकारी व मान्यवरांच्या उपस्थितीत झालेला हा निरोप समारंभ 'फेसबुक लाइव्ह' होता. थेट प्रक्षेपणाच्या माध्यमातून सुमारे २९०० जण त्यामध्ये सहभागी झाले. दरम्यान, डॉ. पी. एस. पाटील, ए. एम. गुरव, भारती पाटील पी. डी. राऊत हे अधिष्ठाता यांचाही कार्यकाळ संपुष्टात आला. त्यांना ग्रंथ भेट देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. शिंदे व डॉ. शिर्के यांना विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, ग्रंथ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची प्रतिकृती देऊन निरोप देण्यात आला. डॉ. शिंदे यांच्या आई नागरबाई, पत्नी अनिता आणि कन्या कैरवी यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी डॉ. शिर्के यांच्या पत्नी सुनिता उपस्थित होत्या. व्ही. टी. पाटील, अभय जायभाये, नमिता खोत, डी. के. गायकवाड, डी. आर. मोरे, आदींनी मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी आभार मानले. दरम्यान, माजी खासदार राजू शेट्टी, डॉ. प्रताप पाटील, आदी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी डॉ. शिंदे यांनी भेटून शुभेच्छा दिल्या.

सोशल मीडियावर आमच्याशी संपर्क | facebook. | @MiLOKM

# परीक्षा रद्द : विद्यार्थ्यांची बौद्धिक स्वायत्तता धोक्यात

**विद्यार्थी** हा केवळ परीक्षार्थीच असतो असा शासनाचा समज झालेला दिसतो. विद्यार्थ्यांनी ज्ञानार्जन करावे व शिक्षक, पर्यायाने विद्यापीठे व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या ज्ञानाचे मूल्यमापन करावे, अशी सर्वसाधारण अपेक्षा आहे. त्यामुळे परीक्षेला विद्यार्थिजीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. सर्वच विद्यार्थ्यांचे पालक आपल्या पाल्यांच्या दैनंदिन अभ्यासाकडे किंवा त्यांच्या बौद्धिक प्रगतीकडे लक्ष देऊ शकत नाहीत. त्याकरिता त्यांना पाल्याच्या परीक्षा व त्यांनी मिळविलेले गुण हे एकमात्र साधन उपलब्ध असते. शाळा / महाविद्यालयांत विद्यार्थी/ विद्यार्थिनींनी ज्ञानार्जन करावे व आपला विकास करावा. त्यानुसार त्या-त्या वर्गाचे अभ्यासक्रम तयार केलेले असतात. केंद्र किंवा राज्यातील शिक्षण मंडळांनी मुला-मुलींच्या वयोगटाचा विचार करुन त्यांना पचेल, रुचेल असाच अभ्यासक्रम तयार केलेला असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना वर्गात शिकविलेला अभ्यासक्रम किती समजला आणि त्यांची बौद्धिक क्षमता किती विकसित झाली, हे तपासण्याचे एकमेव साधन म्हणजे परीक्षा.

आज केवळ भारतातच नाही तर जगात एक अभूतपूर्व अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कोरोना विषाणूमुळे सगळे जनजीवन ठप्प झाले आहे; पण आज शिक्षण क्षेत्रात जी मंडळी काम करीत आहेत व जे महत्त्वाचे दूरगामी परिणाम होणारे निर्णय घेतले जात आहेत. या लोकांनी ज्या काळी शिक्षण घेतले तो काळ व आजचा काळ यांत जमीनअस्मानाचा फरक आहे. आजचे शिक्षण क्षेत्र हे डिजिटल भारताचे प्रतिबिंब आहे. त्यामुळे आजचा विद्यार्थी आणि त्याच्या अभ्यासाच्या मूल्यमापनकडे पाहण्याची आमची दृष्टी बदलायला हवी. एखाद्या कर्जदाराला त्याचे केवळ कर्ज माफ करून भागणार नाही, तर त्याची स्वेच्छेने कर्ज फेडण्याची क्षमता कशी वाढेल यासाठी प्रयत्न करायला हवेत. परीक्षा रद्द करून विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात प्रमोट करून आपण काय साध्य करणार आहोत? परीक्षार्थींच्या मनात परीक्षेबद्दल एक श्रद्धायुक्त भीती असते शिवाय चांगला अभ्यास करून परीक्षेत यश मिळविण्याची जिद्द त्यांच्या मनात असते.





**प्रा. शंकरराव कुलकर्णी**
सिनेट सदस्य,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक करिअरमध्ये काहीएक ध्येय ठेवलेले असते. त्या ध्येयाप्रत जाण्यासाठी त्यांची धडपड चालू असते. परीक्षा रद्द करून नेमके विद्यार्थ्यांचे हेच स्पिरीट मारण्याचे कुकर्म केले जात आहे.

देशभरात सीबीएससी, सीईटी, जेईईच्या परीक्षा होणार आहेत. मग विद्यापीठांना आपल्या परीक्षा घेण्यात काय अडचणी आहेत. यूजीसीने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये असे म्हटलेले नाही की, परीक्षाच रद्द करा. कुलगुरु व शिक्षणक्षेत्रातील धुरिणांनी थोडे संवेदनशील व्हावे व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक करिअरचे काय होणार याचा विचार करावा. मला एक घटना आठवते, मुंबईच्या सोमैया कॉलेजमध्ये अमेरिकेतील एका विद्यापीठाच्या कुलगुरूंचा गेल्या वर्षी प्राचार्यांना मेल आला की, घाटकोपर येथील मुलाला तब्येतीच्या तक्रारीमुळे भारतात परत यावे लागले. दरम्यानच्या काळात त्यांच्या विद्यापीठाच्या परीक्षा लागल्या. त्या विद्यार्थ्याने त्याची परीक्षा भारतात देण्याची तयारी दर्शविली. अमेरिकेतील त्या कुलगुरूंनी प्रश्नपत्रिका स्कॅन करून सोमैया कॉलेजला पाठविली व त्याची परीक्षा घेऊन त्याचे शैक्षणिक वर्ष वाचविले. एक कुलगुरु एका विद्यार्थ्याच्या शिक्षणाचा किती विचार करतो, त्याचे हे ज्वलंत उदाहरण आहे.

आम्ही सरसकट सर्व परीक्षा रद्द करून विद्यार्थ्यांच्या मनावर कोणते संस्कार करतो आहोत? वास्तविक प्राध्यापक / शिक्षण प्रश्नपत्रिकांचे तीन तीन संच तयार करीत असतात. आता शाळांना सुट्टी आहे किंवा शाळा बंद आहेत. तेथे आपण विद्यार्थ्यांची बसण्याची (योग्य ते अंतर ठेवून) व्यवस्था करू शकतो. परीक्षेला पर्याय नसेल तर मग अन्य ऑप्शन्स कोणते आहेत, याचाही विचार व्हावा. शिक्षकांनी आपल्या वर्गातील मुलांकरिता बहुपर्यायी प्रश्नपत्रिका तयार कराव्यात. आज जवळजवळ सर्वांकडे मोबाईल असतो. प्रत्येक घरात तरी नक्कीच एकतरी मोबाईल असतोच. व्हॉट्सअ‍ॅपसारखे प्रभावी माध्यम सर्वजण वापरतात. विद्यार्थ्यांनी आपल्या घरात बसून परीक्षा द्यावी. पुस्तकांचा/संदर्भग्रंथांचा वापर करण्यास मुभा असावी. प्रश्नांची क़ाठिण्यपातळी शिक्षकांनी नीट पाळावी. ऑनलाईन तोंडी परीक्षा घेता येते. मोठ्या कंपन्यांच्या मुलाखती ऑनलाईन घेतल्या जातात. थोडक्यात काय, तर परीक्षा घेतल्याशिवाय निकाल लावू नये व विद्यार्थ्यांना परीक्षा देऊन पास झाल्याच्या समाधानापासून वंचित ठेवू नये.

विनापरीक्षा प्रमोट झालेल्या मुलांना उद्या कोणत्या प्रश्नांना तोंड द्यावे लागेल, याचा विचार व्हायला हवा. त्यांना उच्चशिक्षणातील संधी, शासकीय नोकरीतील संधी यांचे काय होणार, लक्षावधी विद्यार्थ्यांचे करिअर आपण बरबाद करीत आहोत, याचा गांभीर्याने विचार करावा लागेल. कदाचित परीक्षेला उशीर होईल. निकाल उशिरा लागतील, शैक्षणिक वर्ष बदलेल; पण ठीक आहे. एकवेळ हा बदल चालेल; पण परीक्षाच रद्द करणे व विद्यार्थ्यांना त्यांच्या मूलभूत हक्कापासून वंचित ठेवणे योग्य नाही. विद्यार्थ्यांकडून घेतलेली ट्यूशन फी, परीक्षा फी यांचे काय होणार? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात.

मला वाटते, सर्व कुलगुरुंनी विद्यापीठांच्या शैक्षणिक क्षेत्रातील शासनाचा हा हस्तक्षेप उधळून लावावा व परीक्षा घेण्यावर आपण ठाम आहोत व त्या सुस्थितीत घेऊन विद्यार्थ्यांना न्याय देऊ, असे ठामपणे शासनाला सांगण्याची गरज आहे.

# अंतिम वर्ष परीक्षेबाबत विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय व्हावा : डॉ. करमळकर

## प्रभारी कुलगुरूपदाची सूत्रे स्वीकारली

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

कोरोनाचा संसर्ग पुढील काही वर्ष राहील. परंतु, मिळालेली पदवी विद्यार्थ्यांकडे आयुष्यभर राहणार आहे. याचा विचार करून अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबत विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय व्हावा, असे मत पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदाची सूत्रे डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून स्वीकारल्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते.

डॉ. करमळकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठ ही मातृसंस्था आहे. प्रभारी कुलगुरूपदाच्या जबाबदारीमुळे काही काळ मातृसंस्थेची सेवा करण्याची संधी मिळाली आहे. अल्प कार्यकाळात विद्यापीठाचा लौकिक वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न राहील.




कोल्हापूर : मावळते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून प्रभारी कुलगुरूपदाची सूत्रे स्वीकारताना डॉ. नितीन करमळकर. शेजारी मावळते प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. (छाया : पप्पू अत्तार)

डॉ. करमळकर यांचे दुपारी विद्यापीठात आगमन झाले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. यावेळी डॉ. करमळकर यांचे बंधू व पुतणी यांच्यासह श्रीमती नागरबाई शिंदे, अनिता शिंदे, कैरवी शिंदे यांच्यासह मावळते प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. प्रताप पाटील आदी उपस्थित होते. राजाराम महाविद्यालयातून भूगर्भशास्त्र विषयातून बी.एस्सी. पूर्ण केली. त्यावेळी विद्यापीठात एम.एस्सी. भूगर्भशास्त्र नव्हते. त्यावेळी विद्यार्थ्यांनी विद्यापीठावर मोर्चा काढला. बुधवारी त्याच विद्यापीठाचा प्रभारी कुलगुरूपदाचा कार्यभार घेतला आहे. प्रभारी कुलगुरू म्हणून संधी मिळाली आहे. अत्यल्प काळात ठसा उमटविण्याचा प्रयत्न राहील, असे कुलगुरू डॉ. करमळकर म्हणाले.

डॉ. करमळकर हे शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी असून ते मूळचे कणकवलीचे आहेत. त्यांना उच्च शिक्षण क्षेत्रातील अध्यापन, प्रशासन, संशोधनाचा मोठा अनुभव आहे. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील नियतकालिकांमधून त्यांचे अनेक शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत.

# जिथे मोर्चा काढला, तिथेच प्रभारी कुलगुरू झालो

## कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचे प्रतिपादन


करमळकर

कोल्हापूर, ता. १७ : मी कोल्हापुरात लाहानाचा मोठा झालो. चौथी ते बी.एस्सीपर्यंतचे शिक्षण इथेच झाले. त्यावेळी शिवाजी विद्यापीठात भूगर्भशास्त्रामध्ये एमएस्सी नव्हते. हा अभ्यासक्रम सुरू करावा, यासाठी आम्ही विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठावर मोर्चा काढला. आज त्याच विद्यापीठाचा प्रभारी कुलगुरू झालो. कार्यकाळ जरी अत्यल्प असला तरी ठसा उमटवणारे काम करेन, अशा भावना पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी व्यक्त केल्या. आज त्यांनी प्रभारी कुलगुरू पदाची सुत्रे स्वीकारली.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे यांचा कार्यकाळ आज (ता.१७) पूर्ण झाला. प्रभारी कुलगुरू म्हणून पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.नितीन करमळकर यांच्याकडे सूत्रे दिली. आज त्यांनी सूत्रे स्वीकारली. दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास ते कोल्हापुरात आले. त्यानंतर त्यांनी डॉ.शिंदे यांच्याकडून सूत्रे स्वीकारली. ते म्हणाले, 'कणकवली हे माझे मुळ गाव मात्र चौथी ते बी.एस्सीपर्यंतचे शिक्षण कोल्हापुरातच झाले. राजाराम कॉलेजमधून मी भूगर्भशास्त्रात बी.एस्सी केले. त्या काळी शिवाजी विद्यापीठात भूगर्भशास्त्रातील एम.एस. सीचा अभ्यासक्रम उपलब्ध नव्हता. हा अभ्यासक्रम सुरू करावा म्हणून आम्ही विद्यार्थ्यांनी विद्यापीठावर मोर्चा काढला. त्यानंतर पुणे विद्यापीठातून मी एम.एस्सी झालो. आज याच विद्यापीठाचा प्रभारी कुलगुरू झालो. कोल्हापूर हे माझे गाव आहे. शिवाजी विद्यापीठाचा कुलगुरू म्हणून काम करण्यासाठी मी उत्सुक होतो, पण मला ही संधी मिळाली नाही. प्रभारी म्हणून माझा कार्यकाळ अत्यल्प आहे, पण यामध्येही मी माझा ठसा उमटवण्याचा प्रयत्न करेन.' नवीन कुलगुरू येईपर्यंत डॉ.करमळकर काम पाहतील.



कोल्हापूर : वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवी स्मरणिका ग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के आदी.

# पत्रकारितेतील बदलांना पूरक अभ्यासक्रमांचा वेध घेणे गरजेचे

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : वृत्तपत्रविद्या विभागाच्या सुवर्णमहोत्सवी स्मरणिका ग्रंथाचे प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**


कोविड-१९ साथीमुळे जीवनाचे संदर्भ बदलताहेत. त्याचप्रमाणे शिक्षणाचेही संदर्भ बदलताहेत. या बदलांना पत्रकारितेचे क्षेत्रही अपवाद राहिलेले नाही. पत्रकारितेतील या बदलांना पूरक अशा अभ्यासक्रमांचा शोध व वेध घेणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त तयार करण्यात आलेल्या 'पत्रकारिता विभागाची गौरवशाली वाटचाल' या स्मरणिका ग्रंथाचे कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले.

ज्येष्ठ पत्रकार वसंत भोसले, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. सुमेधा साळुंखे-घाटगे, सुधाकर बरगे उपस्थित होते.

# डॉ. करमळकर यांनी स्वीकारली प्रभारी कुलगुरु पदाची सुत्रे



कोल्हापूर : डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून प्रभारी कुलगुरू म्हणून पदाची सूत्रे स्वीकारताना डॉ. नितीन करमळकर. सोबत मावळते प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. नांदवडेकर आदी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरु पदाची सुत्रे बुधवारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून स्वीकारली. डॉ. करमळकर यांचे विद्यापीठात आगमन झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी त्यांचे स्वागत केले.

प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर हे मूळचे कणकवलीचे असून शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी आहेत. शिवाजी विद्यापीठातून भूगर्भशास्त्रात बीएस्सी केल्यानंतर त्यांनी एमएस्सी पुणे विद्यापीठात पूर्ण केली. पुढे 'पेट्रोग्राफी जिओकेमेस्ट्री ऑफ अल्ट्रामफाइटस् फ्रॉम पार्टस ऑफ लडाख हिमालय या विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त केली. ऑस्ट्रेलियातील सिडनीत तसेच जर्मनीत संशोधन केले. पर्यावरण, भूगर्भशास्त्र, भूरसायनशास्त्र हे त्याचे संशोधनाचे विषय. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील नियतकालिकांमधून त्यांचे अनेक शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत.

मातृसंस्थेसाठी योगदान देण्याची संधी

शिवाजी विद्यापीठ ही माझी मातृसंस्था आहे. प्रभारी कुलगुरू पदाच्या जबाबदारीमुळे काही काळ मला या मातृसंस्थेची सेवा करण्याची संधी प्राप्त झाली आहे. या संधीचा लाभ घेऊन मिळालेल्या अल्प कालावधीत अनुभवाचा फायदा करून देईन. विद्यापीठाचा लौकिक वृद्धिंगत करण्यासाठी सर्व संबंधित घटकांना सोबत घेऊन काम करण्यास प्राधान्य राहील, अशी प्रतिक्रिया डॉ. करमळकर यांनी दिली.

# कोल्हापूरचे संस्कार शेवटच्या श्वासापर्यंत जोपासू

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; शिवाजी विद्यापीठाच्या वेबसाईटवरून साधला कार्यपूर्ती संवाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कुलगुरूपदाच्या पाच वर्षांच्या कार्यकाळात विद्यार्थी केंद्रीत उपक्रम राबविले. विद्यापीठाशी संबंधित सर्व घटकांना बरोबर घेऊन सर्वांगिण विकासाचा प्रयत्न केला. संशोधन व कामाच्यानिमित्ताने विविध गावे, शहरे पाहिली. या शहरांनी राहायचे शिकविले. परंतु, कोल्हापूरने जगण्याचे संस्कार दिले ते शेवटच्या श्वासापर्यंत जोपासण्याचा प्रयत्न राहील, असे कृतज्ञतापर भाव शिवाजी विद्यापीठाचे मावळते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केले.

कोव्हिड-१९ साथीच्या पार्श्वभूमीवर मावळते कुलगुरू डॉ. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा निरोप समारंभ मोजके पदाधिकारी व मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. विद्यापीठाच्या वेबसाईटवर कार्यपूर्ती संवादाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. निरोप समारंभाचे 'फेसबुक लाईव्ह' प्रक्षेपण २,९०० हून अधिक जणांनी पाहिले.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने स्थापनेपासून सामाजिक बांधिलकी बाळगली आहे. प्रत्येक कुलगुरूंनी पाऊल पुढे जाईल, अशी धोरणे आखली, त्यामुळे विद्यापीठाचा नावलौकिक आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचला आहे. त्या परंपरेस पुढे नेण्याचा प्रयत्न केला. पाच वर्षांच्या काळात विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व घटकांनी भरभरून प्रेम दिले. मुंबई, पुणे व औरंगाबाद विद्यापीठांचा अतिरिक्त कार्यभार पाहताना शिवाजी विद्यापीठातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी जबाबदाऱ्या पार पाडल्या. जलयुक्त विद्यापीठ उपक्रम राबविल्याने जलस्वयंपूर्णता प्राप्त झाली आहे. सातारा येथे शहीद स्फूर्ती केंद्राची स्थापना केली आहे. विद्यापीठ इतिहास लिखाणाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. विद्यापीठातर्फे आंतरराष्ट्रीय स्तरावरील छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार देण्यात येणार आहे. याची उंची मॅगेसेसे पुरस्काराएवढी उंचाविण्याचा प्रयत्न व्हावा. डॉ. आंबेडकर, राजर्षी शाहू यांच्यानंतर महात्मा फुले, लोकहितवादी आणि पुन्हा डॉ. आंबेडकर यांच्या कर्मभूमीकडे झालेला हा प्रवास अनुभवसमृद्ध करणारा ठरला. विद्यापीठाचा कुलगुरू झाल्यामुळेच फुले-शाहू-आंबेडकर या विचारधारेचा पाईक म्हणून शैक्षणिक परिक्रमा पूर्ण झाली आहे.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, प्रशासकीय जबाबदारी सांभाळताना सर्व घटकांनी सहकार्य केले. पाच वर्षांत जे बोललो ते करण्याचा प्रयत्न केला. विद्यापीठाच्या विकासासाठी सर्वांनी योगदान द्यावे.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, कुलगुरू डॉ. शिंदे यांनी विद्यापीठास पुढे नेण्याची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली. सर्व घटकांना मार्गदर्शन केले. महापूर, कोरोना संकटांत सामाजिक बांधिल जपली.

प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे म्हणाले, कुलगुरू व प्र-कुलगुरू यांचे वेगवेगळे पैलू अनुभवता आले. विद्यापीठातील प्रत्येक घटकावर विश्वास ठेवून विद्यापीठ प्रगतीपथावर पोहोचले आहे. डॉ. भारती पाटील म्हणाल्या, कुलगुरू व प्र- कुलगुरू ही राम-लक्ष्मणाची जोडी आहे. प्रशासनात सुसूत्रता आणून कामकाज केले.

यावेळी डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. टी. पाटील, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. नमिता खोत, डॉ. ए. एम. गुरव, कॅप्टन एन. पी. सोनजे, डॉ. पी. एन. वासंबेकर, प्रा. अजय जायभाये यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी कुलगुरू डॉ. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांना शाल, श्रीफळ स्मृतिचिन्ह व छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिकृती देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या मातोश्री श्रीमती नागरबाई शिंदे, पत्नी सौ. अनिता शिंदे, कन्या कैरवी शिंदे, प्र-कुलगुरूंच्या पत्नी सौ. सुनीता शिर्के यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे मावळते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिकृती देऊन गौरविताना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सौ. सुनीता शिर्के, श्रीमती नागरबाई शिंदे, सौ. अनिता शिंदे, कन्या कैरवी शिंदे आदी. (छाया : पप्पू अत्तार)

### मातृभक्तीचा गौरव

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पाच वर्षांपूर्वी कुलगुरूपदाचा कार्यभार मातोश्री नागरबाई शिंदे यांच्यासमवेत स्वीकारला. निरोप समारंभावेळीही मातोश्री त्यांच्याबरोबर होत्या. हे अनेक मान्यवरांनी भाषणात सांगताना मातृभक्तीचा गौरव केला. प्र- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना कुलगुरूंच्या मातोश्रीबद्दल बोलताना कंठ दाटून आला. कुलगुरूंनी त्यांना सावरण्याचा प्रयत्न केला. यावेळी सभागृहातील वातावरण भावनिक बनले होते.

# विद्यापीठाने अनुभव संपन्न केले

## मावळते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन : जाहीर समारंभाऐवजी

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठातील कुलगुरुपदाचा माझा कार्यकाळ अत्यंत आनंददायी व चिरस्मरणीय झाला. या कालखंडात माझे विद्यापीठ परिक्षेत्रात अनेक ऋणानुबंध निर्माण झाले. त्याचबरोबर विविध पदांच्या जबाबदाऱ्यांनी अनुभवसंपन्न केले, अशी कृतज्ञतेची भावना शिवाजी विद्यापीठाचे मावळते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे व्यक्त केली.



कोल्हापूर : मावळते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे यांना आज विद्यापीठातर्फे औपचारिक निरोप देण्यात आला. कोविड- साथीच्या पार्श्वभूमीवर जाहीर समारंभ टाळून मोजके पदाधिकारी व मान्यवरांच्या उपस्थितीत झालेला हा निरोप समारंभ 'फेसबुक लाइव्ह'च्या माध्यमातून अनेकजणांनी पाहिला.

या समारंभाला त्यांच्या मातोश्री नागरबाई शिंदे, पत्नी अनिता आणि मुलगी कैरवी यांची प्रमुख उपस्थिती होती. कुलगुरूंच्या बरोबरीने प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांचाही कार्यकाळ आज समाप्त झाला. त्यांनाही यावेळी निरोप देण्यात आला. त्यांच्या पत्नी सुनिता शिर्के यावेळी उपस्थित होत्या. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांना विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, ग्रंथ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची प्रतिकृती देऊन निरोप देण्यात आला. सर्व अधिष्ठाता यांनाही ग्रंथ भेट देऊन गौरविण्यात आले.

डॉ शिंदे म्हणाले, 'एका डोळ्यात हसू आणि दुसऱ्या डोळ्यात अश्रू, अशी काहीशी मानसिक अवस्था झाली आहे. पाच वर्षे आपण सारे अत्यंत एकदिलाने या विद्यापीठाचा लौकिक वृद्धिंगत करण्यासाठी काम करीत आहोत. आज मात्र शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील तीनही जिल्ह्यांत माझे ऋणानुबंध निर्माण झाले आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कर्मभूमीकडून राजर्षी शाहू महाराज यांच्या कर्मभूमीकडे झालेल्या माझ्या या प्रवासाने आशीर्वादाचा आणि सदिच्छांचा माझ्यावर वर्षाव केला.''

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, '' शिवाजी विद्यापीठ ही माझी मातृसंस्था आहे. तिला विविध भूमिकांतून योगदान देण्याचा मी नेहमीच प्रयत्न केला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासारख्या संवेदनशील मनाच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाला योगदान देता आले. याचा मोठा आनंद आहे.'

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी.एस. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए.एम. गुरव, मानव्यविद्या विद्याशाखेच्या डॉ. भारती पाटील आणि आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी.डी. राऊत यांनीही त्या निमित्ताने मनोगत व्यक्त केले.

# डॉ. नितीन करमळकर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू

**कोल्हापूर :** पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी बुधवारी शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदाची सूत्रे डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून स्वीकारली. डॉ. करमळकर हे शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी आहेत. बुधवारी दुपारी डॉ. करमळकर यांचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. शिवरायांच्या



पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केल्यानंतर डॉ. करमळकर यांनी कुलगुरू कार्यालयात मावळते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून प्रभारी कुलगुरूपदाची सूत्रे स्वीकारली. डॉ. करमळकर यांचे बंधू व पुतणी

▶▶ पान ११ वर..

# डॉ. नितीन करमळकर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू

(पान १ वरुन) यांच्यासह नागरबाई शिंदे, अनिता शिंदे, कैरवी शिंदे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. हाडाचा शिक्षक, तळागाळात फिरून अभ्यास करणारा संशोधक, नेतृत्वगुण असलेला सक्षम प्रशासक आणि विद्यापीठाची खडानखडा माहिती असणारे प्राध्यापक अशी त्यांची ओळख आहे. डॉ. करमळकर मूळचे कणकवलीचे आहेत. त्यांचा जन्म ११ जानेवारी १९६२ रोजी झाला. त्यांचे हायस्कूलसह पदवीचे शिक्षण कोल्हापूर येथे झाले आहे. शिवाजी विद्यापीठातून भूगर्भशास्त्रात बी.एस्सी केल्यानंतर त्यांनी एमएस्सीसाठी पुणे विद्यापीठात प्रवेश घेतला. पुढे 'पेट्रोग्राफी जिओकेमेस्ट्री ऑफ अल्ट्रामफाईट्स फ्रॉम पार्टस ऑफ लडाख हिमालाय (विथ रेफ्रन्स टू क्रोमॅटिक मिनरलायझेशन)' या विषयात पीएच.डी. प्राप्त केली. याच विषयाशी निगडीत बाबींवर त्यांनी ऑस्ट्रेलियातील सिडनीत तसेच जर्मनीत संशोधन केले.

## मातृसंस्थेसाठी योगदान देण्याची संधी

शिवाजी विद्यापीठ ही माझी मातृसंस्था आहे. प्रभारी कुलगुरूपदाच्या जबाबदारीमुळे काहीकाळ मला या मातृसंस्थेची सेवा करण्याची संधी प्राप्त झाली आहे. विद्यापीठाचा लौकिक वृद्धिंगत करण्यासाठी सर्व संबंधित घटकांना सोबत घेऊन काम करण्यास प्राधान्य राहील, अशी भावना प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी व्यक्त केली.